MHKO030086212024

दाखल दिनांक - ०७/०६/२०२४.

नोंदणी दिनांक - ११/०६/२०२४.

निकाल दिनांक - ०७/०५/२०२६.

कालावधी - वर्षे महिना दिवस.

०१ ११ ००.

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१४ कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी: शिल्पा वि. कुलकर्णी ),**

**नि.फौ.ख.क्र.८३५/२०२४.** **निशाणी क्रमांक १५/ब.**

**गु.र.क्र.३६१/२०२३.**

**दोषारोप** — कॉपी राईट ॲक्ट कलम ५१, ६३, ६४ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>**गांधीनगर पोलीस ठाणे, जि.कोल्हापुर.** |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | | श्री.एस.जे.सरनोबत. |
| **आरोपी** | | **अविनाश विशनदास रोहिडा,**<br>**वय -** ३१ वर्षे, **धंदा** — व्यापार,<br>रा.बॅरेक नं.१७०/११, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्रीमती पी.के.गोपलानी. |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | :- | ०६/०९/२०२३. |
| गुन्हा नोंद झाल्याचा दिनांक | :- | ०७/०९/२०२३. |
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | :- | ०७/०६/२०२४. |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १७/०१/२०२६. |
| साक्षी पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १०/०३/२०२६. |
| साक्षी पुरावा बंद केल्याचा दिनांक | :- | १७/०४/२०२६. |
| निकाल देण्यासाठीचा दिनांक | :- | ०७/०५/२०२६. |
| निकाल दिनांक | :- | ०७/०५/२०२६. |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक (असेल तर) | :- | निरंक. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

**आरोपीची माहिती**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजि (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अविनाश रोहिडा | ४१-अ प्रमाणे नोटीस. | -- | कॉपी राईट ॲक्ट कलम ५१, ६३, ६४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग-क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१. | अविनाश मल्लिकार्जुन पाटील | पंच | ०९ |
| ०२. | सचिन सखाराम सावंत | साक्षीदार | १३ |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | १० | पंचनाम्यावरील अनु.क्र.०१ वरिल स्वाक्षरी. |
| ०२. | १४ | आरोपीचे भा.ना.सु.सं.कलम ३५१ अन्वये निवेदन. |

# न्या य नि र्ण य
**(पारित दि.०७ मे, २०२६ रोजी.)**

आरोपीवर कॉपी राईट ॲक्ट कलम ५१, ६३, ६४ प्रमाणे आरोप ठेवुन सदरचा खटला चालविण्यात आला.

**०२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की -**

दि.०६/०९/२०२३ रोजी १७.५० वा.चे सुमारास देवता कलेक्शन, मेन रोड, सिध्दु मार्केट शेजारी, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे आरोपीने स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता लिव्हाईस या कंपनीचे टी शर्टवर या ब्रन्डचे स्वरुपात असलेले विकण्यास ठेऊन किंबहुना तो खरा त्याच कंपनीचा आहे असे भासवुन त्याची विक्री करण्यासाठी स्वत:च्या दुकानात ठेवलेला असताना मिळुन आला. म्हणुन गांधीनगर पो.ठा. येथे फिर्याद दाखल केली. त्यानंतर प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आला. प्रथम खबर अहवाल दाखल झाल्यावर गु.र.क्र.३६१/२०२३ नोंदविला व तपास तपासणी अधिकारी पो.हे.कॉ. श्री.बी.के.हेब्बाळकर यांच्याकडे सुपुर्त करण्यात आला. त्यांनी घटनास्थळी जाऊन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपास पूर्ण केल्यानंतर वर नमूद कलमांतर्गत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्याच्यावर नि.क्र.०७ अन्वये दोषारोप निश्चित केले. दोषारोप वाचून दाखविल्यानंतर आरोपीने संपुर्ण दोषारोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदविणेत आले. आरोपीचे भा.ना.सु.संहिता कलम ३५१ अन्वये निवेदन नि.क्र.१४ ला नोंदविण्यात आले.

**०४.** उपलब्ध पुरावा, कायद्याच्या तरतुदी लक्षात घेतल्या तसेच अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीचे वकील यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ उद्भवतात. त्या मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारण मिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| ०१. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दि.०६/०९/२०२३ रोजी १७.५० वा.चे सुमारास देवता कलेक्शन, मेन रोड, सिध्दु मार्केट शेजारी, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर आरोपीने स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता लिव्हाईस कंपनीचे बनावट टी शर्ट विक्री करणे गुन्हा आहे हे माहिती असताना देखील विक्री करण्याकरीता स्वत:च्या दुकानात ठेवले ? | **नाही.** |
| ०२. | आदेश काय.? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक ०१ करिता -**

**०५.** आरोपीवर असलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ अविनाश पाटील (फिर्यादी) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.०७/०९/२०२३ रोजी त्यांना गांधीनगर पोलीसांनी पंचनाम्याकामी पोलीस ठाण्यात बोलाविले होते. तेथे त्यांची छापील पंचनाम्यावर सही घेतली. पंचनाम्यावरील अनु.क्र.०१ वर त्यांची सही (नि.क्र.१०) असुन त्यातील मजकुराबाबत त्यांना काही माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने त्याचा उलटतपास घेतला असता कोणताही गुन्हादर्शक पुरावा त्याच्या साक्षीमध्ये आलेला नाही.

**०६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ सचिन सखाराम सावंत (साक्षीदार) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.०६/०९/२०२३ रोजी ते गांधीनगर पो.ठा. येथे पो.हे. कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत असताना त्यांचे वरिष्ठ स.पो.नि.घोडे-पाटील यांनी बोलावून सांगितले की, शशांक त्रिपाठी, नेत्रीका कन्स्ल्टींग इंडीया प्रा.लि. गुडगाव दिल्ली हे अधिकृत प्रतिनिधी व स्टाफ मा.पोलीस निरिक्षक कोल्हापूर या कार्यालयाकडून बनावट टी शर्टची विक्री होत आहे का याची खात्री करण्यासाठी आले आहेत. त्यांच्यासोबत पो.हे.कॉ.कुंभार,

पो.कॉ.कांबळे व शशांक त्रिपाठी, नेत्रीका कन्स्ल्टींग इंडीया प्रा.लि. गुडगाव दिल्ली हे अधिकृत प्रतिनिधी व स्टाफ असे खाजगी वाहन क्र.एम.एच.१२ एस.यु.८०९० याने सिंधु मार्केट येथील देवता कलेक्शन येथे गेले. त्यावेळी दुकान मालकाला त्यांचे ओळखपत्र दाखवले. बनावट मालाची तपासणी करायची आहे असे सांगितले. दुकानात लिव्हाईस कंपनीचे एकूण ३१० बनावट टी शर्ट होते. त्या टी शर्टवर बार कोड दिसून आले नाहीत. त्यामुळे टी शर्ट बनावट असल्याची खात्री झाली. पो.हे.कॉ.कुंभार यांनी मुद्देमाल ताब्यात घेतला व पंचनामा केला. त्यानंतर शशांक त्रिपाठी यांनी फिर्याद दिली.

**०७.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांचे आय.पी.आर.या विषयामध्ये शिक्षण झालेले नाही. ज्या खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले होते त्याची नोंद स्टेशन डायरीला केली होती. देवता कलेक्शन मार्केट एरियामध्ये असुन तेथे बरीच दुकाने आहेत. जप्त केलेला मुद्देमाल बनावट असल्या - बाबतचे प्रमाणपत्र या कामी दाखल केले आहे. दि.०६/०९/२०२३ रोजी रात्री ०८.३० ते ०९.३० या वेळेत छापा टाकला होता. ज्या वाहनाने ते घटनास्थळी गेले त्याचा क्रमांक त्यांना आठवत नसल्याचे कथन केले.

**०८.** न्यायालयीन पटलावर आलेल्या पुराव्याच्या आधारे आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. सदर कामातील पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच साक्षीदार क्र.०२ याने मान्य केले आहे की, त्यांचे आय.पी.आर.मध्ये शिक्षण झालेले नाही. ज्या खाजगी वाहनाने ते घटनास्थळी गेले त्याचा क्रमांक त्यांना सांगता आलेला नाही. त्यामुळे सदर दोन्ही साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाला पुरक ठरत नाही. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. सबब, आरोपीने स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता लिव्हाईस या कंपनीचे टी शर्टवर या ब्रॅन्डचे स्वरुपात असलेले विकण्यास ठेऊन किंबहुना तो खरा त्याच कंपनीचा आहे असे भासवुन त्याची विक्री करण्यासाठी स्वत:च्या दुकानात ठेवलेला असताना मिळुन आला ही बाब सिध्द झालेली नाही. न्यायतर्क शास्त्रानुसार फौजदारी प्रकरणात संशयाच्या फायदा हा आरोपीपक्षास जातो.

सदर कामी आलेला पुरावा हा संशयी स्वरुपाचा वाटतो. त्यामुळे त्याचा फायदा आरोपीपक्षास देणे न्यायोचित वाटत आहे. सदर कामातील जप्त मुद्देमाल - लिव्हाईस कंपनीचे बनावट टी शर्ट एकूण ३१० नग यांची अपिल कालावधीनंतर नियमानुसार निर्गती करणे न्यायोचित वाटत आहे. सबब, मुद्दा क्र.०१ चे निष्कर्ष नकारार्थी देत असुन मुद्दा क्र.०२ चे निष्कर्षाप्रत पुढील आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

**०१.** आरोपीची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अन्वये कॉपी राईट ॲक्ट कलम ५१, ६३, ६४ नुसार या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**०२.** आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत तसेच आरोपीला मुक्त करण्यात येत आहे.

**०३.** सदर कामातील जप्त मुद्देमाल - लिव्हाईस कंपनीचे बनावट टी शर्ट एकूण ३१० नग यांची अपिल कालावधीनंतर नियमानुसार निर्गती करण्यात यावी.

**०४.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ नुसार पुर्ततेसाठी रक्कम रु.१५,०००/- प्रमाणे वैयक्तीक जातमुचलका देण्यात यावा.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित .)*

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.05.07 16:02:19 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापुर.

दि.०७/०५/२०२६.